# विनम्र आवाहन

स्त्री मुक्ती संघटनेची स्थापना १९७५ साली झाली. तेव्हापासून आजतागायत संघटनेच्या कामात आपण सहभागी झाला आहात. संघटनेच्या जडणघडणीत आपले सर्वांचेच मोलाचे योगदान राहिले आहे.

या कालावधीत संघटनेने स्त्रिया व मुले यांच्या विकासाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन अनेक सामूहिक चळवळीत भाग घेतला. अनेक नवे उपक्रम सुरु केले. १९७५ साली स्त्री मुक्तीचा प्रचार करणारा संच असे आपले स्वरुप होते. आता महाराष्ट्रातील स्त्री चळवळीत आपण एक महत्वाचा प्रवाह बनलो आहोत. इतकेच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरही स्त्री मुक्ती संघटनेची विचारधारा आणि उपक्रम व कार्यक्रम यांना व्यापक मान्यता प्राप्त होत आहे.

**संघटनेने हाताळलेले सामाजिक प्रश्न**

- स्त्रियांवर होणारे अत्याचार व हिंसाचार
- नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न
- परित्यक्तांचे प्रश्न
- अत्याचार पीडित स्त्रियांचे व मुलींचे पुनर्वसन
- दारिद्र्य निर्मूलनाचे आर्थिक उपक्रम
- तळागाळातील असंघटित स्त्रियांना संघटित करणे
- स्त्री-पुरुष समानतेसाठी विविध स्तरावरचे प्रसार कार्यक्रम
- हुंडाविरोधी अभियान
- विवाहपूर्व समुपदेशन
- कायदेविषयक मार्गदर्शन
- स्त्री भ्रूणहत्येविरोधी कार्यक्रम

**संघटनेचे उपक्रम**

- पाळणाघरे
- कुटुंब सल्ला केंद्रे
- कलापथक
- स्त्री-पुरुष समानता यात्रा
- जिज्ञासा (कुमारवयीन मुलांसाठी उपक्रम)
- किशोरी मुली व ग्रामीण स्त्रियांसाठी युनिसेफ समवेत कार्यशाळा
- परिसर विकास (कचरा वेचक महिलांसाठी उपक्रम)
- व्यवसाय संधीच्या योजना
- महिलांचे बचतगट
- विद्यार्थी दत्तक पालक योजना
- पोलिसांसाठी प्रशिक्षण उपक्रम
- घनकचरा व्यवस्थापन

समानतेला पूरक आणि हिंसेच्या विरोधात समाजमन तयार करणे अपेक्षित आहे. बदलांसोबत संघटनेच्या कामाला स्वीकारणे, उद्देशांबद्दलची विश्वासार्हता निर्माण करणे हे काम सातत्याने करावे लागते. समाज घडविण्याच्या या कामात संस्थात्मक, रचनात्मक कामाची गरज भासते. आणि म्हणूनच संघटनेला स्वतःची मालकीची जागा मिळणे आवश्यक होते. कामाचा पसारा खूपच वाढत आहे. उपक्रमांच्या गरजेनुसार संघटनेने दादर, चेंबूर, गोवंडी, वाशी, ठाणे, डोंबिवली, अंबरनाथ येथे भाडेतत्त्वावर जागा घेऊन आजवर काम केले. परंतु संघटनेच्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी वेगळ्या प्रकारचे काम करणे आवश्यक आहे. ग्रंथालय, अभ्यासिका, संशोधन, संस्थात्मक उभारणीचे कार्य, सांस्कृतिक अभिसरण इ. गोष्टींचा यात समावेश होतो. मात्र यासाठी स्वतःची वास्तू ही प्राथमिक गरज आहे. आणि अशी जागा संघटनेला कोपरखैरणे-नवी मुंबई येथे मिळाली आहे. अंदाजे १४००० चौरस फुटाचा सामाजिक कार्यासाठी राखून ठेवलेला प्लॉट सिडकोकडून संघटनेने विकत घेतला आहे. पहिल्या टप्प्यात रु. ३० लाख भरुन संघटनेने सदर जागा ताब्यात घेतली ती आपल्यासारख्या हितचिंतकांचे भक्कम आर्थिक पाठबळ लाभले म्हणूनच. दुसऱ्या टप्प्यात जागेच्या बांधकामासाठी **दोन ते अडीच कोटी रुपये** अंदाजे खर्च अपेक्षित आहे. संघटनेला निरनिराळ्या प्रकल्पांसाठी मिळणारे अनुदान हे त्या-त्या कामासाठी खर्च होत असल्याने इमारत बांधण्यासाठी लागणारी गंगाजळी संघटनेकडे नाही. ही रक्कम आपल्या सहकार्याने, मदतीने आणि देणगीतून उभी होईल याची खात्री आहे. त्यासाठी आपण एकरकमी देणगी द्यावी, तसेच आपल्या परिचयातील व्यक्तींनाही देणगी देण्यासाठी उद्युक्त करावे अशी अपेक्षा आहे. आपण निश्चय केलात तर यातून स्त्री मुक्ती संघटनेची स्वतःची पर्यावरण स्नेही वास्तू उभी राहू शकेल. ज्यामध्ये बायोगॅस, पाण्याचा पुनर्उपयोग, सौरउर्जा इ. चा वापर करण्यात येईल.

**या इमारतीमध्ये पुढील उपक्रम राबविण्याचा संघटनेचा मानस आहे.**

- सांस्कृतिक केंद्र
- प्रशिक्षण केंद्र
- कुटुंब सल्ला केंद्र
- पाळणाघर
- महिला वसतिगृह
- तात्पुरता निवारा गृह
- पर्यावरण प्रशिक्षण केंद्र
- महिला विकासाचे विविध उपक्रम

देणगी डिमांड ड्राफ्ट/चेकने ('स्त्री मुक्ती संघटना' या नावाने) अथवा रोख देता येईल. प्रस्तुत देणगी ८०-जी अंतर्गत कर सवलतीस पात्र आहे. आमच्या अमेरिकेतील हितचिंतकांनी त्यांची देणगी महाराष्ट्र फाऊंडेशनतर्फे पाठविल्यास तेथील करसवलतीचा त्यांना लाभ घेता येईल.

**देणगीदारांसाठी बँकेचा तपशील**

स्त्री मुक्ती संघटना
स्टेट बँक ऑफ इंडिया (चेंबूर शाखा)
सन बीम, १८ वा रस्ता, चेंबूर, मुंबई ४०००७१

**खाते क्र.** : 10339724163

SWIFT No. : SWIFT SBI NINBB 514

FCRA NO. : 083780682

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **ज्योति म्हापसेकर** | **शारदा साठे** | **अमोल केरकर** | **नीलिमा देशपांडे** | **प्रज्ञा सराफ** |
| अध्यक्ष | सचिव | उपाध्यक्ष | सहसचिव | खजिनदार |